लोकमत

# भुयारी मेट्रोची रुळजोडणी सुरु...



◆ कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३ कामासाठी फ्लॅश बट वेल्डिंग मशीन मुंबईत दाखल झाले. या मशीनने रुळजोडणीचे काम छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ स्थानक येथून शुक्रवारपासून सुरु झाले.

मुंबई : मेट्रो-३ साठी फ्लॅश बट वेल्डिंग मशीनने वेल्डिंगद्वारे अखंड रुळ तयार करण्यात येतील. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे प्रकल्प संचालक सुबोध कुमार गुप्ता म्हणाले की, १०,७४० टन हेड हार्डन्ड रुळ लागतील. ८,३६६ टन रुळ प्राप्त झाले असून, उर्वरित लवकरच जपानहून येतील. तर, मशीन स्वयंचलित असून यात योग्य वेल्डिंग होण्यासाठीचे सर्व मापदंड निश्चित केले आहेत. ३३.५ किमी लांबीच्या मार्गिकेचे वेल्डिंग ११ ठिकाणांहून करण्यात येईल, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी स्पष्ट केले.